REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# अंधश्रध्दा आणि स्त्रिया : एक समाजशास्त्रीय विश्लेषण

प्रा.डॉ.एस.जे.इंगळे
के.आर.एम.महिला महाविद्यालय, नांदेड




## प्रस्तावना :

आजच्या आधुनिकीकरनामुळे, विज्ञानाच्या ज्ञान प्रसारामुळे व्यक्तींमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसीत होउन अंधश्रध्दा नष्ट होणे अपेक्षीत आहे. जसे की, डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी म्हंटल्याप्रमाणे अंधश्रध्दा हा अज्ञानाचा अंधार आहे व ज्या प्रमाणात विज्ञानाचा, शिक्षणाचा प्रकाश येईल त्या प्रमाणात अज्ञानाचा अंधकार असलेली अंधश्रध्दा आपोआपच वितळून जाईल. पण तसे झालेले दिसत नाही.

अंधश्रध्देत विज्ञानाचे नियम डावलले जात असून कार्यकारण भावाचा विचारही यात होतांना दिसत नाही. म्हणून अंधश्रध्दा प्रत्यक्षपणे मानवी शोषन व मुल्यांना पायदळी तुडवून दिमाखाने उभी असलेली दिसून येते. विशेष म्हणजे अंधश्रध्देबाबत चर्चा करुन सुध्दा जनसामान्यांना म्हणजेच अंधश्रध्दा बाळगणाऱ्या व्यक्ती किंवा समुहाचा प्रचंड विश्वास व भावनिक दृष्ट्या जास्त गुंतवणूक यात असलेली दिसून येते. खरे तर घडणाऱ्या प्रत्येक घटनेस ज्ञानाच्या अनुभवाच्या सहायाने पडताळणी होणे अवघड असते, कारण अंधश्रध्दा बाळगणारी व्यक्ती व समूह तिची चिकीत्सा करतांना दिसत नाहीत व इतरांनाही करु देत नाहीत कारण चिकित्सा करणे हा एक प्रकारचा हल्ला असल्याचे समजले जाते. थोडक्यात व्यक्तीने अज्ञानाला ज्ञान समजत त्या बाबतच्या भावनेची कवचकुंडले चढवलेली असल्यामुळे चिकित्सा पडताळणी करणे म्हणजे स्वतःला असुरक्षीत व दुःखदायक घटना वाटल्यामुळे अंधश्रध्दा नष्ट होणे कठीण होउन बसते. पर्यायाने व्यक्ती व समाजाच्या प्रगतीत फार मोठा अडसर निर्माण होतांना दिसून येतो.

मानवी जिवनात श्रध्दांना महत्त्वपूर्ण स्थान असते. श्रध्दा म्हणजे तपासलेल्या विचाराचे भावनेत परिणीत झालेले रुप म्हणजेच श्रध्दा. डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या मते एखाद्या कालखंडात जी श्रध्दा म्हणून गौरवलेली असते ती दुसऱ्या कालखंडात अंधश्रध्दा म्हणून स्विकारलेली दिसून येते. एखाद्या समूहाला जी अंधश्रध्दा वाटते ती दुसया समूहाला पवीत्र वाटू शकते. उदा.शतकापूर्वीची सतीप्रथा ही आज अमानूष अशा प्रकारची अंधश्रध्दा ठरवल्या गेलेली दिसते. तसेच स्त्रीशिक्षण, मासीकपाळीतील अपवित्रता, पती निधनानंतरचे केशवपन, विधवा विवाहाची निशीध्दता अशी अनेक उदाहरणे धर्मश्रध्देचाच भाग होती. म्हणूनच श्रध्दा हया तपासून पहाव्या लागतात. त्यांच्या मते विज्ञानाच्या विकासाचा सारा इतिहास हा श्रध्दा तपासावयाचा इतिहास आहे. म्हणूनच श्रध्देची चिकित्सा करुन ज्या श्रध्दा समाज जिवनात अनिष्ट, अयोग्य वाटतात त्या अंधश्रध्दा नष्ट करणे आवश्यक ठरते.

## संशोधन पध्दती :—

प्रस्तुत अध्ययन अंधश्रध्दा व स्त्रीचा एक समाजशास्त्रीय विश्लेषण हे अंधश्रध्दा बाळगणाया स्त्रीयांचा अभ्यास करणारे असून या प्रश्नाचे स्वरुप, कारणे परिणाम व उपाययोजनेबाबत यात विश्लेषन करण्यात आलेले आहे.

**अध्ययनाची आवश्यकता :—**

समाजातील लोकसंख्येच्या निम्मा भाग असलेल्या स्त्रीयांच्या समस्यांसंदर्भात अनेक समाजसुधारक प्रयत्न, शिक्षण, कायदे, धोरणे, कृती कार्यक्रम यातून सोडवणूकीचे प्रयत्न होत गेले व होत आहेत. शिक्षण, विज्ञान तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही आज स्त्रीयांचा सहभाग दिसून येत आहे. एकीकडे ही प्रगती दिसत असतांना आजच्या आधूनिक जगातही उच्च विद्या विभूषीत तसेच विज्ञानातील उच्च पदव्या मिळविलेल्या स्त्रीयांविषयी तर विचारायलाच नको. म्हणूनच या समस्येची जाणीव करुन देण्याच्या दृष्टीने प्रस्तुत अध्ययन हाती घेतलेले आहे.

अंधश्रध्दा निर्मूलनासाठी गेली अनेक वर्षापासून अंधश्रध्दा निर्मुलन समितीकडून प्रयत्न होतांना दिसत आहे. अंधश्रध्देच्या विविध विषयांवर चर्चा, शिबीर, व्याख्याने, वादविवाद यासारखे कार्यक्रम ही होतांना दिसून येतात.

पुरुषांच्या तुलनेत स्त्रीया जास्त प्रमाणात अंधश्रध्देला बळी पडतांना दिसतात.

ज्या स्त्रीया अंधश्रध्दा बाळगतात त्या मात्र अंधश्रध्देला कोणत्याही परिस्थितीत टाकून दयायला तयार होतांना दिसत नाहीत. आणि म्हणून 'बुवा तेथे बाया' व 'बुवा तेथे माया' हे सर्वार्थाने खरे असतांना दिसते. मूल न होणारी स्त्री अंधश्रध्दा बाळगत एखाद्या बुवाकडे दैवी कृपेचा प्रसाद मागण्यास जाते तेव्हा माझी सेवा कर, भैरवी पुजा कर असे अवैज्ञानिक प्रकार तो स्त्रीला करावयास सांगत स्त्रीयांची फसवणूक व दिशाभुल करतांना दिसतो. यात स्त्रीया अलगद सापडतांना दिसतात. बुध्दी सामर्थ्य, विवेक व निर्भयता यांच्या आधाराने स्वतःचे प्रश्न सोडवतांना स्त्रीया दिसून येत नाहीत. पूर्व संस्काराचा स्त्रीयांवर जबरदस्त पगडा असल्याचे दिसून येते. पूर्वजन्मीच्या पापामुळे या जन्मात दुःखे आपल्या वाट्याला येतात या कर्म सिद्धांतामुळे आपली दुःखे दुर करण्यासाठी बाबा, बुवा, भगत हे मध्यस्थाची भुमिका समाजात पुर्वीपासून पार पाडत आलेले दिसून येत असल्यामुळे संकटात सापडलेली स्त्रि प्रारब्धच्या कल्पनेने अशा अंधश्रध्देच्या मागे लागलेली दिसते. परिणामी बुवा बाजीचे सामर्थ्य वाढीस लागते.

डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या मते, गेल्या काही वर्षापासून विज्ञान शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होउ लागला आहे. नवीन पिढीची चिकित्सक बनत चालली आहे. बुवा, बाजीच्या लढ्यात तरुण पुरुष मोठ्या संख्येने हिरिरीने भाग घेत आहेत. त्यामुळे अनेक अंगांनी अंधश्रध्दा निर्मूलनाची व परिवर्तनाची चळवळ वाढत आहे. तथापी, बुवा—बाजीचा धंदा हा बरकतीचा धंदा असल्याने या मंडळींनी तंत्रबदलाचे कसब दाखविले आहे. त्यांच्याकडे असलेली साधन सामग्री फसवी विज्ञानभाषा आणि जनसामान्यांचा त्यातही स्त्रियांचा त्यांना अधीक पाठींबा असल्यामुळे आजही बुवाबाजी विरुध्दची लढाई विषमच आहे. पण ही लढाई निर्गहपुर्वक चालू ठेवावी लागेल. व्यक्तीच्या आयुष्यातील काही प्रश्न सुटनारे नसतांनाही प्रश्न सोडवीन अस अनैतीक दावा केल्याने स्त्रियांचा दैववादीपणा व त्यांचे शोषन वाढत जातांना दिसते.

स्माजात स्त्रिया जास्त प्रमाणात अंधश्रध्देच्या लागल्याने त्या इतर कारणात दुसऱ्यांच्या कलाने वागण्याचे स्त्रिचे अंगभूत दुबळेपण हे स्त्रीला अंधश्रध्देत बळी पडण्यात पोषक असलेले दिसते. एखाद्या स्त्रिला मुल न होणे किंवा मुलीच होणे, पतीचा मृत्यू अशा घटनांना मुख्यतः त्या स्त्रीलाच जबाबदार धरलेले दिसते. कुटूंबातील सदस्य अशा स्त्रियांना मानसीक, शारिरीक छळ करतांना आढळतात. अशा स्त्रिच्या मनात कोंडमारा झाल्याने अशी स्त्रि साहजीकच बुवाबाजीला लवकर बळी पडतांना दिसते. आपल्या समाजात लग्न होणे अतिआवश्यक, प्रतिष्ठेची बाब मानली गेल्याने व चांगला पती मिळावा तरच जीवनाचे सार्थक होईल. अशा समजुतीने स्त्रिया अंधश्रध्देस बळी पडतांना दिसतात. स्त्रिचे असलेले परावलंबन हे ही अंधश्रध्दा वाढविण्यास जबाबदार असल्याचे दिसते. डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या मते त्यासाठी धैर्य, आत्मविश्वास, विज्ञान दृष्टी यांचा वापर करुन प्रश्नांच्या मुळाशी भिडण्याची वृत्ती त्यांच्यात विकसीत झाली पाहीजे. कारण ही स्त्रियांची अगतीकता व त्यांना निबृध्द ठेवण्याची प्रक्रीया वाढवत असते. स्त्रिचे कुबड्यांचे आधार बळकट करणारी असते. स्त्रियांनी अशा कुबड्या काढून टाकल्या तर स्त्री ही सर्व सामर्थ्यांनीशी बळ एकवटून आत्मनिर्भर बनतील यात शंका नाही.

**अध्ययन विषय निवडीची कारणे**

1. आज विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रचंड काळातहीग्रामीण, अशिक्षित स्त्रीयांबरोबर विज्ञान तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात उच्च पदवी प्राप्त स्त्रीयाही अंधश्रध्दा बाळगतांना दिसतात.

2. समाजात स्त्रीया पुरुषांच्या तुलनेत अंधश्रध्दा बाळगातांना व बुवाबाजीला बळी पडलेल्या दिसून येतात.

## अध्ययनाचा उद्देश

1. स्त्रीया अंधश्रध्दा बाळगत असलेल्या कारणांचा शोध घेणे
2. अंधश्रध्देला होणारा परिणाम अभ्यासणे.
3. अंधश्रध्दा बाळगणाऱ्या व्यक्तींमध्ये विवेकनिष्ठ विचार रुजविण्यासाठी उपाययोजना सुचविणे

## गृहीत कृत्ये

1. शिक्षित व अशिक्षित स्त्रीया अंधश्रध्दा बाळगतांना दिसतात.

## अध्ययनाचे क्षेत्र

प्रस्तुत अध्ययनासाठी मी प्रामुख्याने दुयम माहितीचा वापर केला आहे. त्यासाठी मी मा.डॉ. श्री नरेंद्रजी दाभोळकर, हमीद दाभोळकर तसेच प्रा.प.रा. आर्डे व श्याम मानव यांनी लिहीलेल्या ग्रंथाव्दारे माहिती संकलीत केली आहे.

## निष्कर्ष

1. बुवाबाजी भक्ष प्रामुख्याने स्त्रीया असल्याचे दिसते.
2. ग्रामीण स्त्री, अशिक्षित स्त्री, अंधश्रध्दा बाळगतांना दिसते.
3. स्त्रियांची शैक्षणिक स्थिती पाहता स्त्रीया विज्ञानातील उच्च शिक्षित असूनही अत्यंतीक अंधश्रध्दा बाळगतात.
4. अंधश्रध्देमुळे स्त्रियांना अनेक प्रकारचे शोषन होते.
5. अंधश्रध्देमुळे स्त्रियांना अनेक त्रासांना व समस्यांना सामोरे जावे लागते.
6. अंधश्रध्देत स्त्रीयांची भावनीक गुंतवणूक असल्याने व देवाधर्माचा आधार दिला गेल्याने अंधश्रध्देच्या दूष्परिणामांची जाणीव त्यांना होतांना दिसत नाही.
7. अंधश्रध्दा बाळगल्याने होणाऱ्या दुष्परिणामाबद्दल त्या स्वःताची चूक ठरवत स्वतःलाच दोषी मानत असल्याचे दिसून येते.
8. पूर्व संस्कार व कर्मसिद्धांताचा पगडा मनावर असल्याने अंधश्रध्देला बळी पडणे सहज शक्य होते.
9. अंधश्रध्देला बळी पडण्याचे कारण स्त्रीयांची असुरक्षितता व अगतीकता असल्याचे दिसून येते.
10. दुसऱ्या व्यक्तीच्या कलेने वागण्याचे स्त्रीचे अंगभूत दूबळेपण बुवाबाजीच्या आहारी जाण्याचे कारण होय.
11. अडगळीत असलेल्या भक्तांना मानसिक दिलासा देणे व त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करु शकतो हे बाबाबुवांचे आश्वासन त्यांना शरण जाण्यास पूरेसे ठरते.
12. फसवणूक करणाऱ्या बुवा बाबांवर फसणारी व्यक्ती तक्रार करतांना दिसत नसल्यामुळे पोलीस कारवाई करतांना दिसत नाहीत.
13. धार्मीक भावना दुखावल्यास धार्मिक तणावात भर पडण्याची शक्यता असल्याने त्यांच्यावरील कारवाईस अडचण येते.
14. अंधश्रध्देच्या मागे लागून फसल्या गेलेल्या व्यक्ती समाजात आपली प्रतिमा कमी होईल व तक्रार केल्यास कोर्ट कचेरीचे झंझट मागे लागेल म्हणून तक्रार करण्यास धजावत नाहीत.
15. अंधश्रध्दा व बुवाबाजी चालू रहावी असे मानणाऱ्या व्यक्ती, नेते, पुढारी, शासन कर्ते अशा व्यक्ती समाजात असल्यामुळे बुवाबाजीस संरक्षण प्राप्त होत असल्याचे दिसते.
16. आमचे असाध्य आजार बुवाने हमखास बरे केले असे सांगणारे लोक सर्वत्र आढळून येतात. कारण हे आजार एकतर क्रियाविषयक असल्याने हे शक्य होते किंवा संमोहन कौशल्य, सुचनेचा परिणाम म्हणून व्यक्तीचे आजार बरे झालेले क्वचित दिसून येतात.
17. अनेक बुवाबाबा सामाजिक कार्यात सहभागी असल्यामुळे त्यांच्यावरील जनसामान्यांचा विश्वास वाढल्याचे दिसते.
18. मनाचा कोंडमारा, सततचा तणाव, त्यातुन होणाऱ्या मानसिक असंतूलनामुळे स्त्रीया अंधश्रध्देला बळी पडतात.

LBP PUBLICATION

19. स्त्रीयांचे कुटूंबात असणारे दुयम स्थान, सर्वस्वी परावलंबन यामुळे स्त्रीया अंधश्रध्देस कळी पडतात.
20. स्त्रीयांच्या अतृप्त लैगींकतेच्या दडपणामुळे ही पुरूषांपेक्षा स्त्रीयांना येणारा ताण अधीक असल्याने स्त्रीया अंधश्रध्देळू बनतात.
21. स्त्रीयांना मातृत्वामुळे शरीरात होणारे शारिरीक, मानसिक अवस्थतील बदलांमुळे, सततच्या बाळंतपणामुळे तीच्या आरोग्याबाबतच्या हेळसांडीमुळे, दूर्बल मनोवस्था इ.पोषक परिस्थिती कारणीभूत असल्याचे दिसून येते.
22. अंधश्रध्दा बाळगणे, चमत्कार दाखविणे, बुवाबाजी हे प्रकार सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या मान्यताप्राप्त मानले गेल्याने यात चुकीचे, गैर असावे असे मानले जात नाही.
23. जगभरात अनेक धर्मात मृत्यूनंतरचे अस्तीत्व आल्याचा पूनर्जन्म या गोष्टी मानल्या गेल्याने अंधश्रध्दा बळावण्यास मदत होते.
24. विज्ञान पूर्व काळात धर्ममार्तंडानी या निसर्गाचे ज्ञान केवळ कल्पना विलासातून लोकांसमोर आल्याने तसेच जन्ममृत्यु, आत्मा, पूनर्जन्म याबद्दलच्या केलेल्या कल्पना विलासामुळे अंधश्रध्दा बळावल्याचे दिसते.
25. अंधश्रध्देमुळे स्त्री आरोग्यावर विपरीत परिणाम होतात.
26. अंधश्रध्देमुळे पैशांचा मोठ्या प्रमाणात अपव्यय स्त्रीयांकडून होतांना दिसतो.
27. अंधश्रध्देमुळे स्त्रीयांना शारिरीक उपभोग घेणाऱ्या घटनांना बलात्कारासारख्या अनेक अनैतिक गोष्टींना सामोरे जावे लागते.
28. अंधश्रध्देमुळे स्त्रीला फसवणूकीस सामोरे जावे लागते.
29. मिळणाऱ्या पाठींब्यामुळे स्त्रीया अधिकाधिक अंधश्रध्दाळू बनल्याचे दिसते.

## सुचना

1. धार्मीक अंधश्रध्दा दृष्ट, रूढी, परंपरा असलेल्या समाजात अंधश्रध्दा निर्मूलन कार्यक्रम अतिशय महत्त्वाचा ठरतो.
2. अंधश्रध्दा निर्मुलनासाठी काही ठोस पावले उचलने उदा.प्रबोधन, चर्चा, व्याख्याने, कार्यशाळा, शिबीरे आवश्यक ठरते.
3. शाळा महाविद्यालयातील शिक्षणामधुन अंधश्रध्देबाबत वैज्ञानिक दृष्टीकोन रूजविणे.
4. अंधश्रध्देच्या निर्मुलनासाठी चिकित्सक कार्यक्रम घेणे गरजेचे ठरते.
5. स्त्रीयांना चांगले जीवन जगण्याच्या हमी सोबत स्त्रीयांना समान वागणूक देणे.
6. स्त्रीयांसाठी आरोग्यसेवा पूरवीणे
7. एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून समाजात स्त्री समर्थपणे उभे राहू शकेल यासाठी प्रयत्न व्हावेत.
8. ब्वाबाजीला बळी न पडण्यासाठी स्त्रियांना शिक्षणाबरोबरच दिलासा देणारी पर्यायी केंद्रे उभारली जावीत.
9. मनसिक आरोग्याबाबत जाणीव जागृती निर्माण करणे तीची जोपासणा करणे आदी मनोविकारांवर उपाय करणे
10. प्रसार माध्यमातुनही अंधश्रध्देच्या सर्व बाजूनी विचार करून विवेकपूर्ण बाजू जनतेसमोर प्रकर्षाने मांडली जावी.

## संदर्भ ग्रंथ सुची :–

1. अंधश्रध्दा : प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम : लेखक डॉ. नरेंद्र दाभोळकर, प्रा.प.रा.आर्डे, प्रकाशन राजहंस प्रकाशन, पुणे.
2. अंधश्रध्दा विनासाय : लेखक डॉ. नरेंद्र दाभोळकर, प्रकाशन राजहंस प्रकाशन, पुणे
3. ऐसे कैसे झाले भोंदू : बुवाबाजीचा समग्र पंचनामा, लेखक डॉ. नरेंद्र दाभोळकर, मनोविकार प्रकाशन, नारायण पेठ, पुणे.
4. प्रश्न मनाचे : लेखक डॉ.हमीद दाभोळकर, डॉ.नरेंद्र दाभोळकर, राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे.